सकाळ

# ‘सायबर वॉरिअर्स’चा पारितोषिक वितरण समारंभ



आळे (ता. जुन्नर) : विद्यार्थ्यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर.

**आळेफाटा, ता. १ :** आळे (ता. जुन्नर) येथील ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळ संचलित बाळासाहेब जाधव महाविद्यालयातील बीसीए व बीएस्सी संगणक शास्त्र विभाग व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या सायबर शिक्षा या प्रकल्पाच्या महाविद्यालयीन स्तरावरील पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून क्विक हिल फाउंडेशन, ऑपरेशनल एक्सलन्स व क्विक हिल टेक्नॉलॉजीच्या प्रमुख अनुपमा काटकर, फाउंडेशनचे संचालक अजय शिर्के तसेच संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे ,बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे, किशोर कुऱ्हाडे, भाऊ कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबू कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके, प्रदिप गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

फाउंडेशनसोबत महाविद्यालयातील ३० सायबर वॉरिअर्सनि सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या अभियानांतर्गत केलेल्या कौतुकास्पद कामगिरीसाठी पारितोषिक वितरण कार्यक्रमात वॉरियर्सला मेडल सर्टिफिकेट व सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव यांनी फाउंडेशनसोबत राबवीत असलेला उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्तुत्य असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन विभाग प्रमुख नूतन जोशी, सर्जेराव थोरात व सर्व सहकारी प्राध्यापकांनी केले.